# १

# पत्रकारिता - पत्रकारितेवरील दृष्टीक्षेप अभ्यास (JOURNALISM : JOURNALISM STUDIES : AN OVERVIEW)

**प्रकरणाची रचना :**

१.० उद्दिष्टे

१.१ प्रस्तावना

१.२ पत्रकारितेची व्याख्या

१.३ पत्रकारितेचे स्वरूप

१.४ पत्रकारितेची व्याप्ती

१.५ पत्रकारितेचे कार्य

१.६ पत्रकारितेचे प्रकार

१.७ भारतातील पत्रकारितेचा विकास

१.८ पत्रकारितेचे कायदे

१.९ सारांश

१.१० प्रश्न

१.११ संदर्भ साहित्य

munotes.in

## १.० उद्दिष्टे (OBJECTIVE)

- पत्रकारितेची संकल्पना, व्याप्ती, कार्य, प्रकार, कायदे समजून घेणे.
- भारतीय पत्रकारितेच्या विकासावरती दृष्टीक्षेप टाकणे.

## १.१ प्रस्तावना (INTRODUCTION)

सोळाव्या शतकामध्ये जागतिक स्तरावरती पत्रकारिता सुरुवातीचा काळ म्हणून ओळखला जातो. या काळामध्ये जर्मनी मध्ये छपाई मशिनचा शोध लागला होता. तेव्हा वृत्तपत्र आणि मासिके ही सार्वजनिक शिक्षण देण्याची भूमिका निभावत होती. सन १६५५ मध्ये प्रथम राजकीय पत्रकाची निर्मिती करण्यात आली. त्याला Oxford Gazette म्हणून वृत्तपत्राचा दर्जा देण्याची आवश्यकता निर्माण झाली. यातून वृत्तपत्राची सुरुवातीची ओळख निर्माण झाली. पत्रकारिता हे प्रासंगिक घटनाची माहितीचे उत्पादन आणि वितरण आहे. तीचा जागतिक पत्रकारिता ही व्यवसाय म्हणून उपयोगात आणला

आहे. तसेच नागरि पत्रकारिता ही माहितीचे संकलन आणि प्रकाशन करण्यात येऊ लागली. या पत्रकारिता माध्यमामध्ये बातमी पत्र (वृत्तपत्र) रेडीओ, दूरदर्शन आणि इंटरनेट इत्यादींचा समावेश करण्यात आला. पत्रकारिता ही बातमी आणि माहितीचे संकलन, निर्मिती, मुल्यमापन आणि सादरीकरणाची कृतीशील प्रक्रिया आहे हे एक निर्मितीक्षम उत्पादन आहे. ही एक संवादाची प्रक्रिया आहे. या माध्यमातून व्यापक जनसमुदायाशी संपर्क माहितीच्या देवाण घेवाणीतून करता येतो. यामधून सार्वजनिक प्रश्नाची चर्चा व्यापक जनसमुदायासमोर ठेवून त्यातून जनमत जनजागृती आणि मनोरंजन इत्यादी गोष्टी लोकशाही समाजात करता येतात. पत्रकारिता ही व्यापक जनसमुदायाचे हित समोर ठेवून केली जाते. त्याचा हेतू हा प्रत्येक नागरिकाला बातमीच्या स्वरूपात त्यांचा दैनंदिन जीवनातील घडणाऱ्या घटनाच्या बरोबर समाज आणि त्यांचे प्रशासन या संबंधीत माहिती प्रसारित करण्याचा असतो.

पत्रकारिता ही व्यापक संकल्पना आहे. ती प्रत्येक देशात व्यापक सार्वत्रिक स्तरावरती भूमिका निभावते. हे सरकारच्या निर्णयावरती अप्रत्यक्ष प्रत्यक्षरित्या नियंत्रण ठेवण्याचे कार्य करते. ते सरकार पेक्षा स्वतंत्र्यरित्या कार्य करत असते. ती खाजगी उद्योग म्हणून नफा मिळवत असते. हे करत असताना व्यापक जनमत समोर ठेवून लोकशाही पद्धतीने कार्य केले जाते.

एकविसाव्या शतकामध्ये पत्रकारितेचे स्वरूप अधिक व्यापक बनत आहे. नवीन माहिती तंत्रज्ञानाचा उपयोग करुन पत्रकारिता अधिक प्रभावी, सुनियोजित व्यापक स्तरावरती होत आहे. यासाठी संगणक, इंटरनेट, सामाजिक माध्यमे याचा वापर अधिक प्रमाणात होत आहे.तसेच डिजीटल माध्यमांचा वापर करुन बातम्यांचा प्रसार अधिक व्यापक आणि गतिशील जनमाध्यम म्हणून होताना दिसत आहे.

## १.२ पत्रकारितेची व्याख्या (Definition of journalism)

पत्रकारिता ही संकल्पना व्यापक अर्थाने स्पष्ट करण्याचे काम अनेक अभ्यासकांनी केले आहे. पत्रकारिता या शब्दाला इंग्रजी मध्ये Journalism असे म्हटले आहे. हा शब्द विशेषत: वृत्तपत्रासंबंधी वापरण्यात आला आहे. त्याच बरोबर रेडिओ, दूरदर्शन आणि इंटरनेट इत्यादी वरील बातमीची सादरीकरणा संदर्भात केली आहे. Journalism या शब्दाची उत्पत्ती लॅटिन Latin शब्दात Daily म्हणजे दैनंदिन असा अर्थ समजून घेता येतो. रोम मध्ये Acta Diurna यांनी प्रथम याला Newspaper वृत्तपत्र हा शब्द उपयोगात आणला. जे वृत्तपत्रात दैनंदिन बातमीचे लेखन करतात त्यांना बातमीदार/ पत्रकार असे म्हणतात. काही अभ्यासकांनी पत्रकारितेच्या व्याख्या पुढीलप्रमाणे सांगितल्या आहेत.

१) **लेसले स्टीफन्स (Leslie Stephens)** यांच्या मते 'पत्रकारिता म्हणजे दैनंदिन घटनांच्या संदर्भात लेखनासाठी पैसे दिले जातात जे तुम्हाला माहित नसते."

२) **वेबस्टर थर्ड इंटरनॅशनल डिक्शनरी** यांच्या मते, पत्रकारिता ही संकल्पना मध्यकालीन घटनांच्या संबंधीच्या माहितीचे संकलन आणि संपादन, सादरीकरण, प्रकाशन किंवा प्रसारण संबंधीत आहे.

३) **अमेरिकन प्रेस इंस्टीटॅशन** यांच्या मते 'पत्रकारिता ही माहिती आणि बातमीचे संकलन, निर्मिती, सादरीकरण आणि मुल्यकनचे क्रियाकलाप आहे. तसेच ती उत्पादनशील क्रिया आहे."

४) **जरन्यालिजम डिक्शनरी** यांच्या मते, 'पत्रकारिता ही व्यवसाय म्हणून बातमीचे लेखन, संपादन, बातमीदार, फोटोग्राफी किंवा प्रसारनाशी संबंधीत बाब म्हणून ओळखली जाते."

५) **इंनसायक्लोपिडीया ऑफ ब्रिटानिया** यांच्या मते पत्रकारिता ही बातमीचे संकलन, निर्मिती आणि वितरणाची प्रक्रिया आहे आणि ज्याचे रेडिओ, दूरदर्शन, फोटोग्राफी (छायांकन) चित्रपट याच बरोबर मुद्रित आणि इलेक्ट्रोनिम माध्यम म्हणून वृत्तपत्र, मासिके, पुस्तके, बलॅग, वेबकास्ट, सामाजिक माध्यमे आणि इमेल इत्यादींच्या माध्यमातून दैनंदिन आणि भविष्यकालीन घटनाचे प्रतिबिंब म्हणून ओळखले जाते.

६) **झेलीअर** यांच्या मते, पत्रकारिता ही आजूबाजूच्या लोकांनी स्वत: इन इतरासहित माहितीचे सामाईक करणाची आवश्यकता आयोजित केली जाते तिला पत्रकारिता असे म्हटले जाते.

७) **बॉन्ड एफ प्रिसेर** यांच्या मते पत्रकारिता ही सार्वजनिक स्तरावरती बातमी पोहोचवताना बातमीची निर्मिती आणि टिपण्या करण्याचे विविध प्रकार आहे, जी सर्वत्र जगभर पाहण्यास मिळते. ज्यामध्ये बहुसंख्य लोकांचे हितसंबंध असतात आणि जे पत्रकार मुलभूत भौतिक आधारे विचार क्रिया आणि संकल्पनाची निर्मिती म्हणून केली जाते.

थोडक्यात पत्रकारिता ही सार्वत्रिक स्तरावरती बातमीची निर्मिती संकलन, संपादन आणि प्रसारणाची प्रक्रिया म्हणून ओळखली जाते. पत्रकारितेचा अर्थ हा दैनंदिन जीवनात घडणाऱ्या घटनांच्या माहितीचे सप्रेशनाच्या संदर्भात आहे. ज्यामध्ये मुद्रित श्राव्य आणि दृश्य स्वरूपाची निर्मिती संपादन, सादरीकरण, प्रसारण करण्यातून पत्रकारितेचे सादरीकरण केले जाते.

## १.३ पत्रकारितेचे स्वरूप (NATURE OF JOURNALISM)

पत्रकारिता ही संकल्पना व्यापक अर्थांनी समजून घेण्यासाठी त्याचे स्वरूप समजून घेणे आवश्यक आहे. त्यामुळे या संकल्पनेचे नेमके स्वरूप काय आहे यासाठी पत्रकारितेचे स्वरूप पुढील मुद्याच्या आधारे स्पष्ट करता येईल.

**१) पत्रकारिता ही घटनाची वेळेवर बातमी देणे (Journalism is the timely reporting of event) :**

सार्वजनिक जीवनामध्ये अनेक घटनांची माहितीचे बातमीच्या स्वरुपात मांडणी केली जाते. या घटना विषयीची माहिती सर्वत्र पोहोचवण्याचे काम केले जाते. या घटनाचे स्वरुप अधिक वस्तूनिष्ठ व व्यक्तिनिरपेक्ष आणि अधिक तत्परतेने व्यापक स्तरावरती सादर करतात त्यामुळे त्या घटनाना बातमी आणि माहितीच्या स्वरूपात लेखन निर्मिती संपादन आणि प्रसारण इत्यादींच्या सादर करतात. त्यामुळे अधिक प्रसिद्धीचे मूल्य व जनमत निर्मिती त्यामुळे केली जाते.

**२) पत्रकारिता ही समाजाच्या संबंधात दृष्टिकोन आणि बातमीचे प्रसार आहे (Journalism is dissemination of news and view about the society) :**

पत्रकारिता ही समाजात घडणाऱ्या घटनाचे बातमीच्या स्वरूपात प्रसार करते. समाजात दैनंदिन जीवनात अनेक घटना घडत असतात. त्यांच्या लेखन संपादन निर्मिती आणि प्रसारण करण्यासाठी पत्रकारिता केली जाते. त्यामुळे घटनेची माहिती सार्वजनिक करण करण्यात येते.

**३) पत्रकारिता ही माध्यम संप्रेषण क्षेत्रात कार्य करते (Journalism Activity Field in Mass Communication) :**

पत्रकारिता ही माध्यम संप्रेषणाचा मुख्य केंद्रबिंदू मानला जातो. माध्यमाच्या प्रसारणामध्ये पत्रकारिता मुद्रित, ध्वनी आणि चित्रफित आणि इंटरनेट या पातळ्यावरती कार्यरत असतात. यामध्ये रेडिओ, दूरदर्शन, इलेक्ट्रोनिक माध्यम, इंटरनेट सामाजिक माध्यमे यांच्यातून माध्यम संप्रेषण ही पत्रकारितेचे क्षेत्र म्हणून कार्यरत असल्याचे दिसून येते.

**४) पत्रकारिता ही लोक शिक्षणाचे माध्यम बनते (Journalism has become the media of mass education) :**

पत्रकारिता ही बातमी आणि माहितीचे प्रसारण व्यापक जनसमुदायापर्यंत करत असते. दैनंदिन जीवनातील घटनांचे माहिती आणि बातमीचे प्रसारण हे लोक शिक्षण करण्याचे कार्य करते. त्यामुळे एखाद्या घटनेचे सविस्तर माहिती प्रचार होतो. त्याचा उपयोग लोकांना माहितीच्या स्वरूपात ज्ञान प्राप्ती होते. त्यामुळे ज्ञाननिर्मिती प्रसारण प्रक्रिया सोईस्कर आहे.

**५) पत्रकारिता अधिक प्रभावी बातमी सादरीकरण (Journalism has a it main activity reporting of event):**

पत्रकारिता ही घटनाच्या संदर्भात प्रभावी बातमीचे सादरीकरण आहे. हे करत असताना प्रासंगिक घटनाचे माहितीचे संकलनासाठी अनेक प्रश्न निर्माण केले जातात. यामध्ये का,

कुठे, काय, कसे, कोण इत्यादी प्रश्नातून माहिती संकलन संपादन आणि सादरीकरण केले जाते. बातमी निर्मिती करण्याचे प्राथमिक प्रश्नाची निर्मिती महत्वपूर्ण मानली जाते.

**६) पत्रकारितेमध्ये अनेक माध्यमाचा समावेश (Journalism exits in a number of media) :**

पत्रकारिता ही अनेक माध्यमाचा समावेश होतो. त्यामुळे त्याची व्यापकता मुद्रित श्राव्य आणि दृश्य अशा प्रकारच्या माध्यमातून दिसते. या माध्यमामध्ये रेडिओ, इलेक्ट्रोनिक, इंटरनेट याच्या माध्यमातून अनेक माध्यम समुह निर्माण केले जातात. ते माहिती आणि बातमीचे सार्वजनिक स्तरावरती पोहचण्याचे काम केले जाते. त्यामुळे बातमी आणि माहितीचे प्रसारण अधिक गतिशील व परिवर्तनशील स्वरुपात विकसित होत असल्याचे दिसून येते.

**७) पत्रकारिता ही माध्यमांच्या व्यापक स्तरावरती कार्य करते (Journalism is a browder sector work of mass media) :**

पत्रकारिता ही व्यापक स्तरावरती कार्य करते. यासाठी विविध माध्यमांच्या पातळीवरती कार्य करत असतात. सर्वसामान्य ते गुंतागुंतीच्या क्षेत्रामध्ये जाऊन प्रत्यक्ष दर्शी त्या घटनेचे निरिक्षण नोंदवून ती सर्व सामान्य लोकांपर्यंत पोहोचवण्याचे कार्य करत असतात. त्यामुळे त्याची व्यापकता अनेक स्तरापर्यंत पोहोचवण्याचे कार्य करते. सर्वसामान्य व्यक्तीना या विषयीची माहिती सहज रित्या उपलब्ध करुन दिली जाते.

थोडक्यात पत्रकारिता ही निरंतर चाललेली प्रक्रिया आहे. जी माहिती आणि बातमीच्या प्रसारामध्ये, निर्मिती, संपादन, प्रकाशन इत्यादी स्तरावरती कार्य करते. त्यामुळे दैनंदिन जीवनात घडणाऱ्या घटनाची माहिती सर्व सामान्यपर्यंत पोहोचवण्याचे कार्य होते. त्यासाठी अनेक प्रकारच्या माध्यमाचा वापर करुन जनप्रबोधन करण्यात येते.

## १.४ पत्रकारितीची व्याप्ती (SCOPE OF JOURNALISM)

पत्रकारिता हे जनमाध्यम म्हणून ओळखले जाते जे की दैनंदिन जीवनातील घटनाचे वस्तूनिष्ठ निरीक्षण करुन त्याचे लेखन केले जाते. त्यामुळे ही माहिती सर्वसामान्यपर्यंत पोहोचण्याचे कार्य करते. त्यामुळे पत्रकारितेला व्यापक व्याप्ती प्राप्त होते. त्यांची व्याप्ती पुढील मुद्याच्या आधारे स्पष्ट करता येईल.

**१) पत्रकारिता ही सार्वत्रिक आहे (Journalism is Universal) :**

सर्वसाधारणपणे संपूर्ण जागतिक स्तरावरती पत्रकारितेचे स्वरूप सार्वत्रिक दिसून येते. या पत्रकारितेच्या माध्यमातून बातमी आणि माहितीच्या प्रसारणासाठी निर्मिती संपादन आणि प्रकाशन यांच्या संबंधीत कार्य करत असते. त्यामुळे दैनंदिन जीवनात घडणाऱ्या घटनाची सविस्तर माहिती प्राप्त होते. ही माहिती सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, आर्थिक, राजकीय आंतरराष्ट्रीय घडामोडी यांच्याविषयीची सविस्तर माहिती वाचका समोर पोहोचवण्याचे कार्य सार्वत्रिक स्तरावरती पोहोचवते. त्यातून माहिती, मनोरंजन,

munotes.in

खेळ, आरोग्य, शिक्षण, नोकरी, व्यवसाय, उद्योगधंदा, आंतरराष्ट्रीय संबंध या विषयीची माहिती प्रसारित केली जाते.

**२) पत्रकारिता प्रथम नागरिकांशी प्रमाणिक निष्ठा असते (Journalism First Loyalty is the Citizens) :**

पत्रकारिता हे व्यापक माध्यम आहे. त्यामुळे बातमी आणि माहितीची व्यापकता अधिक सार्वजनिक स्तरावरती पोहोचवले जाते. हे करत असताना नागरिक हा केंद्रबिंदू मानून त्यांना अपेक्षित वस्तूनिष्ठ व नाविण्य माहिती तपासून पाहून ती नागरिकापर्यंत पोहोचवली जाते. त्यामुळे बातमी आणि माहितीला अन्यन साधारण महत्त्व प्राप्त होते. त्याचा परिणाम वाचकाच्या मतप्रणालीवरती होतो. त्यावरतीच पत्रकारितेची प्रामाणिकता प्रभावी कार्य करत असते.

**३) पत्रकारिता प्रथम सत्य बंधनकार नाही (Journalism’s first obligation is not the truth) :**

पत्रकारिता ही व्यापक स्तरावरती कार्य करत असताना ती प्रथम सत्य बंधनकारक नाही. कारण दैनंदिन घटनाचे स्वरूप, सधिंग्ता आणि गुंतागुंतीच्या स्वरूपात असते. त्यामुळे त्या घटनाची सत्यता पडताळून पाहत असताना अनेक बदल होत असतात. त्याच्या घटनांची पुनरावृत्ती होणे आवश्यक आहे. त्यामुळे त्यामध्ये सातत्य आढळून येत नाही. त्यामुळे सत्य माहिती विषय बंधनकारक राहू शकत नाही.

**४) पत्रकारिता ही सारांश पडताळणीची शिस्त आहे (Journalism essence is discipline of verification) :**

दैनंदिन जीवनात घडणाऱ्या घटकांची नोंद पत्रकारितेच्या माध्यमातून घेतली जाते. तेव्हा या घटनांची पडताळणी सारांश स्वरूपात शिस्त ठेवण्याचे कार्य केले जाते. त्या घटना समजून घेताना त्याचे निरीक्षण वस्तूनिष्ठ आणि सत्यशीलपणे तपासणी करण्यात येते. हे करत असताना त्या घटनेच्या स्थळी पोहचून त्या संबंधी अनेक व्यक्तीशी माहिती तपासून पाहिली जाते. त्यामुळे त्याची पडताळणी करुन त्याचे माहिती आणि बातमी मध्ये रूपांतरण केले जाते.

**५) पत्रकारिता ही बातमी कोण करत असतो यावरती अवलंबून असते (Journalism must maintain an independent from those they cover):**

पत्रकारिता मध्ये बातमी आणि माहितीचे संकलन करण्यासाठी पत्रकारावरती अवलंबून असते. पत्रकारितेमध्ये बातमीदाराची भूमिका महत्त्वाची असते. जो प्रत्यक्षामध्ये घटना ज्या ठिकाणी घडली आहे त्या ठिकाणी जाऊन माहितीचे संकलन करुन बातमीच्या स्वरूपात त्याची मांडणी करत असतात. तेव्हा पत्रकार कशाप्रकारे त्या घटनेला पाहतो त्या घटनेचे महत्त्व आणि जनतेवरील परिणाम इत्यादी बाबींचा विचार करुन बातमीचे

संकलन केले जाते. त्यामुळे पत्रकाराची भूमिका ही त्या बातमीच्या अनुशंगाने महत्त्वाची असते.

### ६) पत्रकारिता ही सत्तेचे स्वतंत्रपणे निरीक्षण करते (Journalism as an independent monitor of power) :

पत्रकारिता ही सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नाची मांडणी वृत्तपत्रामध्ये करत असते. त्यामुळे पत्रकारितेचे स्वतंत्र अस्तित्व निर्माण करण्यासाठी सार्वजनिक प्रतिनिधीत्व करण्याचे काम करते. ह्या समस्या प्रश्न सरकार समोर उपस्थित करत असते. त्यामुळे सत्ताधारी पक्षाचे लक्ष या प्रश्नाकडे वेधण्याचे कार्य करत असते. त्यामुळे पत्रकारिता हे सत्ता नियंत्रणावरती लक्ष केंद्रीत करुन ठेवण्याची भूमिका निभावत असते.

### ७) पत्रकारिता ही एका मंचावर सार्वजनिक टिका आणि तडजोड प्रदान करतात. (Journalism must provide a forum for public and compromise)

पत्रकारिता ही दैनंदिन जीवनातील घटनाचे बातमी आणि माहिती प्रसारण सर्वसामान्य जनतेसमोर ठेवले जाते. हे करत असताना जनतेच्या प्रश्नाचे राजकारण करण्यात येते. ते प्रश्न शासन, सत्ता, राजकारण आणि न्यायपालिकेसमोर ठेवले जातात. तेव्हा त्याविषयावर सार्वजनिक टिका केली जाते. त्यामुळे व्यापक जनमत निर्माण करुन न्यायाची भूमिका स्पष्ट करतात. तसेच काही प्रश्नाची सोडवणूक करण्यासाठी यांच्याशी काही योग्य वेगळी तडजोडीची भूमिका घेत असतात. त्यामुळे पत्रकारिता आपली योग्य भूमिका निभावत असते.

### ८) पत्रकारिता व्यवसायाला त्यांचा वैयक्तिक विवेक वापरण्याची परवानगी दिली पाहिजे (Journalism Practitioners must be allowed to expercise their personal coscience):

पत्रकारिता हा व्यवसाय आहे. यामध्ये प्रत्येक पत्रकार आपली भूमिका आणि कार्य निभावत असतो. हे करत असताना या व्यवसायात पत्रकाराला त्याच्या वैयक्तिक विवेक वापरण्याची परवानगी देण्यात येणे आवश्यक आहे. त्यामुळे त्याची स्वतंत्र वस्तूनिष्ठ निरीक्षणे, मते, लेखन पद्धत, विश्लेषण आणि मनोरंजन जाहिरात इत्यादी संबंधीत मांडणी, परखड मते व्यक्त करता येणे आवश्यक आहे. याचे स्वातंत्र्य महत्त्वाचे आहे. तरच वैयक्तिक विवेकी मत व्यक्त करता येईल.

थोडक्यात पत्रकारितेची व्याप्ती व्यापक प्रमाणात समजून घेता येते. पत्रकारिता हा व्यवसाय जरी असला तरी ते लोकशाही समाजातील जनतेचे प्रतिनिधी म्हणून कार्य करत आहे. ही जनता शासन आणि राजकारण यांच्यामधील दुवा म्हणून कार्य करत असते. त्याचबरोबर सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक, आर्थिक, राजकीय, मनोरंजन आणि जाहिरात इ. क्षेत्रात महत्त्वपूर्ण भूमिका निभावते. त्यामुळे त्याची व्याप्ती अधिक व्यापक स्वरूपात आहे.

munotes.in

**आपली प्रगती तपासा :**

१) पत्रकारितीची व्याख्या सविस्तर स्पष्ट करा.

२) पत्रकारितेचे स्वरूप स्पष्ट करा.

३) पत्रकारितेची व्याप्ती सविस्तर स्पष्ट करा.

## १.५ पत्रकारितेचे कार्य (FUNCTIONS OF JOURNALISM)

पत्रकारिता ही व्यापक स्वरूपात जनसामान्याच्या प्रश्नाविषयी कार्यरत असते. ते प्रश्न सोडविण्यासाठी प्रभावी व सातत्यशील माध्यम म्हणून प्रयत्न करत असते. त्याच बरोबर बहुआयामी स्वरूपाची कार्य समाजात करावी लागतात. त्यामुळे पत्रकारिता आपले स्वतंत्र अस्तित्व टिकवून आहे. हे पुढील मुद्याच्या आधारे समजून घेता येईल.

**१) माहिती देणे (To information) :**

सध्यकालीन परिस्थिती मध्ये घडणाऱ्या घटना प्रसंगाविषयीची माहिती सर्वसामान्यांन पर्यंत पोहोचवण्याचे मुख्य कार्य पत्रकारिता करते. प्रत्येक सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, आर्थिक, राजकीय, मनोरंजन, क्रीडा, आरोग्य, शिक्षण शेती, व्यापार, व्यवसाय, जाहिरात आणि आंतरराष्ट्रीय संबंधीविषयीची माहिती देण्यात येते. या माहितीचा वापर सर्वसामान्य वाचकापर्यंत पोहोचवण्याचे कार्य केले जाते. दैनंदिन घटनाचे माहिती व बातमीच्या स्वरूपातील निर्मिती संपादन, प्रकाशन, प्रसिद्धी व प्रसारण इत्यादी द्वारे हे कार्य करणे सोईस्कर होते. त्यामुळे वृत्तपत्रे हे माहितीचे महत्त्वाचे माध्यम म्हणून पाहिले जाते.

**२) विश्लेषण (Interpret) :**

दैनंदिन जीवनात घडणाऱ्या घटनाचे वस्तूनिष्ठ माहितीचे विश्लेषण पत्रकारिता कार्य करत असते. एखाद्या घटनेची माहिती बरोबर त्या संबंधीत घटनाचे सविस्तर विश्लेषण केले जाते. त्याच्या संबंधीत घटना त्यांची निर्मिती, स्थळ, काळ, व्यक्ती याचा संबंध जोडण्यात येतो. याचे व्यक्ती व समुदाय यावरती काय सकारात्मक आणि नकारात्मक परिणाम होतील या विषयीचे सविस्तर विश्लेषण केले जाते.

**३) मत निर्मिती (Mold Opinion) :**

समाजात घडणाऱ्या घटनाविषयी माहितीचे विश्लेषण, बातमी, अग्रलेख, स्तंभ लेखन करण्यातून त्या विषयाकडे लक्ष वेधले जाते. सर्वसामान्य वाचकाला समाजात घडलेल्या घटनाविषयी माहिती मिळाल्यानंतर त्या घटनांचा व्यक्ति व समाजपरत्वे अर्थ वेगळा होत असतो. असे असले तरी वाचकाच्या मनाला विचार करायला भाग पाडेल अशा लेखनातून प्रश्न उपस्थित करणे आवश्यक आहे. या प्रश्नातून वाचक स्वतंत्रपणे विचार करु लागतो. त्यातून त्या प्रश्नांकडे पाहण्याचे मत दृष्टिकोन निर्माण होते. सुज्ञ वाचकांना या सर्व प्रश्नाचे आकलन सहजरीत्या होते तेव्हा मत निर्मितीची प्रक्रिया सहजरित्या होते.

परिणामी वाचक आपल्या प्रतिक्रिया,मते आणि दृष्टिकोन मुक्तपणे व्यक्त करतो. ते पत्रकारितेचे मुख्य कार्य म्हणून समजले जाते.

### ४) चर्चेची निर्मिती (Descusion making) :

एखाद्या घटनेसंबंधीची माहिती व बातमी वाचकासमोर पत्रकारिता ठेवत असते. तेव्हा त्या संबंधीची सखोल माहिती आणि विश्लेषण वाचकाच्या समोर ठेवल्याना. वाचकाच्या विचारामध्ये त्या घटनेकडे पाहण्यासंदर्भात दृष्टिकोण निर्माण होतो. यातून 'बी' या प्रश्नासंदर्भात विविध मतांचे लोक एकत्र येऊन प्रतिक्रियेच्या स्वरूपात आपले मत सार्वजनिक ठिकाणी व्यक्त करतात. यातून समान जाणीव वाचक वर्गाची निर्मिती केली जाते.

### ५) प्रबोधन करणे (To Enlightenment):

पत्रकारिता ही समाजातील प्रत्येक व्यक्तीच्या प्रबोधनासाठी कार्य करते. समाजात अचानकपणे निर्माण झालेल्या नैसर्गिक आपत्ती, रोगराई, साथीचे आजार, सामाजिक, धार्मिक समस्या, राजकीय वाद इत्यादी अनेक प्रसंगामध्ये वाचकाचे प्रबोधन केले जाते. त्यामुळे प्राप्त परिस्थितीमध्ये नेमके काय मत व्यक्त करावे या प्रश्नाकडे पाहायचे त्यासंबंधी निर्णय व उपाययोजना कसे करावे त्याचे गांभीर्य ओळखून प्रबोधनाचे कार्य पत्रकारिता निभावत असते.

### ६) शासकीय माहितीचा प्रसार (Spread of Government Information) :

पत्रकारिता सामान्य जनता आणि प्रशासन यामधील दुवा मध्यस्थाची भूमिका निभावत असते. शासकीय स्तरावरती जनतेच्या विकासकामा संदर्भात अनेक निर्णय घेण्यात येतात. त्याचे योजनाच्या स्वरूपात लोकांमध्ये पोहोचवण्याचे काम करत असतात. जनतेला नेमक्या समस्या काय आहे त्यासंबंधी शासनाने यावरती कोणत्या योजना निर्माण केल्या त्याची अंमलबजावणी त्यातून लाभार्थ्यांची निर्मिती या विषयीचे मुल्यमापन सत्यता लोकांसमोर आणून लोकांचे प्रबोधन बरोबर शासनाला याविषयी प्रश्न उपस्थित करुन दिले जातात. परिणामी या योजनामध्ये जनआधारित परिवर्तन करुन त्याची अंमलबजावणी कडे लक्ष वेधले जाते त्यामुळे पत्रकारितेचे कार्य महत्त्वपूर्ण आहे.

### ७) राजकीय परिस्थितीचे विश्लेषण (Analysis of Political Condition) :

सध्य परिस्थिती केंद्रात आणि राज्यातील राजकीय घडामोडी संदर्भात विश्लेषण करण्याचे कार्य पत्रकारिता करते. राजकीय निवडणूक, प्रश्न, प्रचार, जाहिरनामे, नेतृत्व, सत्ता संपादन राजकीय ऐक्य बंडखोरी सत्ता संपादन इ. विषयी चर्चा वाचकांना देण्याचे काम केले जाते. त्या राजकारणाचा स्थानिक व्यवहारावरती काय परिणाम होतो त्याचे राजकीय हितसंबंधी प्रश्न याविषयीच्या घडामोडीवरती अनेक अभ्यासक, विचारवंत, राजकीय विश्लेषक, याचे विचार व्यक्ती करण्यास व्यासपिठ निर्माण केले जाते. परिणामी राजकीय विश्लेषण करण्यात पत्रकारिता यशस्वी कार्य करते.

### ८) आंतरराष्ट्रीय संबंधाचे विश्लेषण (Analysis of International Relation):

पत्रकारितेच्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय संबंधाचे विश्लेषण वाचकासमोर ठेवण्याचे कार्य केले जाते. यामध्ये आंतरराष्ट्रीय स्तरावरती नेमक्या कोणत्या घडामोडी घडतात त्याचा आपल्या देशामध्ये काय परिणाम होईल, हा परिणाम आर्थिक आणि राजकीय स्वरूपाचे कसे होतील, कोणते आंतरराष्ट्रीय करार झाले, जागतिक बँक व्यापार शेती संरक्षण आरोग्य शिक्षण, रोजगार सुविधा इत्यादी विषयीची माहिती वाचकांपर्यंत पोहचवली जाते. त्यामुळे अनेक बाजूनी आंतरराष्ट्रीय संबंधाचे विश्लेषण करण्याचे कार्य पत्रकारिता करत असते.

### ९) खेळ आणि मनोरंजन (Entertainment and Sports) :

पत्रकारितेच्या इतर कार्यापैकी खेळ आणि मनोरंजन ही तितकेच महत्त्वाचे आहे. या दोन्ही संबंधात महत्त्वाची बातमी आणि माहिती वाचकापर्यंत पोहोचवण्याचे कार्य बातमीदार/ पत्रकारिता सतत करत असतो. त्यामुळे आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, राज्य आणि स्थानिक क्रीडा प्रकारची प्रत्यक्ष दर्शी प्रसारण, चित्रण आणि लेखन करण्यात येते. त्यामुळे क्रीडा स्वरूपाच्या बातम्या वाचकांपर्यंत पोहोचवल्या जातात. मुख्यत: क्रिकेट, फुटबॉल आणि अॅथलॅटिक्स क्रिडा प्रकार प्रेक्षकांन समोर ठेवला जातो. तसेच मनोरंजना मध्ये साहित्यलेखन, नाटक, संगीत, गायन, नृत्य, चित्रपट, पटकथा, लघुमालिका इत्यादी प्रकारच्या माध्यमातून वाचकांना माहिती दिली जाते. त्याला प्रसिद्धी जाहिरात आणि समीक्षणपर लेखन कार्य पत्रकारितेच्या माध्यमातून वाचकांना नवीन माहिती सातत्याने समोर ठेवली जाते.

थोडक्यात पत्रकारितेच्या कार्याचा आढावा घेतला असता असे दिसून येते की, पत्रकारितेचे कार्य वाचकांना सातत्याने नवनवीन माहिती प्रसारित प्रचारित करण्याचे काम करते, वाचकांच्या आवडीनुसार त्याला अपेक्षित नेमके काय आहे हे जाणून घेऊन नवीन मांडणी करण्यात येते. यासाठी अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या अभिरुची, संवेदना, जाणीव निर्माण करण्याचे कार्य केले जाते. त्यामुळे आजच्या संदर्भात पत्रकारितेचे कार्य महत्त्वपूर्ण भूमिका निभावत असल्याचे स्पष्ट होते.

**आपली प्रगती तपासा :**

१) पत्रकारितेचे नेमके कार्य सविस्तरपणे वर्णन करा.

## १.६ पत्रकारितेचे प्रकार (TYPES OF JOURNALISM)

एकविसाव्या शतकामध्ये पत्रकारिता क्षेत्रामध्ये व्यापक प्रमाणात गतिशीलता आणि परिवर्तनात्मक विकास होत आहे. त्याचे स्वरूप बदलत असताना त्यांचे स्वरूप समजून घेणे आवश्यक आहे. पत्रकारितेचे विविध प्रकार हे त्यांच्या लेखनाचे विषय आणि महत्त्वावरती अवलंबून आहे. या संबंधीचा नेमका वाचक वर्ग कोणत्या आवडीचा आहे त्यानुसार लेखन प्रकार समृद्ध व विकसित केला जातो. याचबरोबर विशिष्ट प्रकारचे कौशल्य, गुणवत्ता आणि आवडीवरती विकसित केला जातो. त्याच्या या आधारित

प्रकारानुसार पत्रकारितेचा विकास होतो. ही पत्रकारिता विशिष्ट विषय आधारित तपास बातमी, दिर्घकाळ लेखक, मालिका बातमी, अग्रेलख, प्रासंगिक लेखन, स्तंभ लेखन इत्यादीच्या स्वरूपात पत्रकारिता प्रकारामध्ये केला जातो. हे प्रकार मुद्रित श्राव्य दृश्य आणि सामाजिक माध्यम (इंटरनेट) इत्यादींच्या स्वरूपानुसार समजून घेता येतो, याचा उद्देश हा व्यक्ति व समाजावरती विविध माध्यमातून सामाजिक घटनाचा परिणाम तपासून पाहिला जातो, हे विविध पत्रकारितेच्या प्रकाराच्या माध्यमाने समाजावरील परिणाम नोंदवण्याचे काम करते. त्यामुळे वस्तुनिष्ठ बातमी आणि माहिती वाचकांना पोहचवण्यात यश प्राप्त होते. पत्रकारितेचे प्रकार पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**१) शोध पत्रकारिता (Investigative Journalism) :**

शोध पत्रकारिता हा पत्रकारितेच्या प्रकारातील महत्त्वाचा प्रकार म्हणून ओळखला जातो की जो एक विशिष्ट विषयासंबंधी शोध आधारित पत्रकारिता प्रकार आहे. यामध्ये गुन्हेगारी, राजकीय भ्रष्टाचार, अत्याचार इत्यादीसारख्या घटनाच्या आधारे शोधपत्रकारिता केली जाते. शोधपत्रकारिता बातमी लिहिताना अधिक कालावधी लागतो. याच्यासाठी शोध कार्य करण्यास बातमीदारास अधिक वेळ घेऊन लेखन कार्य करावे लागते. ही पत्रकारिता पारंपरिक वृत्तपत्रे, मासिके आणि मुक्त पत्रकारितेचे पत्रकार यामध्ये कार्यरत असतात. अनेक वृत्तपत्रे यामध्ये गुंतवणूक करण्यास तयार नसतात. कारण ही पत्रकारिता खर्चिक अधिक श्रम आणि वेळखाऊ स्वरूपाची आहे. त्यामुळे ही पत्रकारिता संघटीत पातळीवरती विविध वृत्तपत्रे सामुदायिक पातळीवरती कार्य करतात.

**२) विकासात्मक पत्रकारिता (Development Journalism) :**

विकासात्मक पत्रकारिता ही प्रसार माध्यमांचे सामाजिक परिवर्तन आणि विकासाच्या स्तरावरील योगदान म्हणून ओळखली जाते. सन १९६० मध्ये Press Foundation of Asia या संघटनेने विकसित केली. फिलिपिनो पत्रकार अलान चालकलेय (Alan Chalkley) आणि ज्युऑन मेरकॅडो (Juan Mercado) यांनी सामाजिक आर्थिक विकासा संबंधीत पत्रकारिता निर्माण करण्यास सुरुवात केली. या पत्रकारितेचा उद्देश शासकीय धोरणाच्या जनसामान्याच्या सामाजिक आर्थिक विकासावरती नेमका परिणाम काय झाला याची बातमी केली जाते. तसेच शासकीय योजना प्रकल्पाचा सामान्य स्तरावरती नेमके काय परिणाम होतात यांचे मुल्यमापन करण्याचे कार्य केले जाते. सद्यस्थितीत विकास पत्रकारिता ही राज्याच्या सामाजिक, आर्थिक विकास आणि त्यांचा विकासात्मक सुधारणा कशी होते त्याच्या बातमी व माहिती या लेखन पत्रकारितेमध्ये करतात. तसेच सामाजिक, आर्थिक दारिद्र्य, बेरोजगारी, प्रकल्पग्रस्त व भ्रष्टाचार इत्यादी आंतरराष्ट्रीय राजकीय समुदायाचे समस्येकडे लक्ष्य वेधून घेण्याचा माध्यम प्रतिनिधी म्हणून भूमिका निभावते. या समस्येकडे इतर माध्यम पत्रकारितेने दुर्लक्ष केले आहे अशा समस्या जनसमुदायासमोर पत्रकारिता, शेती, अन्नसुरक्षा, शिक्षण, साक्षरता, बेरोजगारी, माहिती तंत्रज्ञान विकास, घरांची परिस्थिती पर्यावरण चिरंजिवी विकास, शहरी ग्रामीण विकास, लिंगभाव समानता इत्यादी विषयी पत्रकारिता केली जाते. त्यामुळे नागरिकांचे

munotes.in

विकासात्मक समस्या सोडवण्यासाठी आणि शासकीय धोरणात लोकाभिमूख परिवर्तन करण्यास महत्त्वाचे योगदान देतात. त्यामुळे सद्यस्थितीत या पत्रकारितेला महत्त्व आहे.

### ३) पिवळी पत्रकारिता (Yellow Journalism) :

पिवळी पत्रकारिता ही अमेरिकेतून पत्रकारितेची संकल्पना म्हणून ओळखली जाते. ही पत्रकारिता वृत्तपत्राच्या मुख्या पानावरती हेडलाईन आणि लक्षवेधी स्वरूपाची असते. ही पत्रकारिता अनैतिक किंवा व्यवसायास कांळीबा असणारे सादरीकरण म्हणून ओळखतात. Joseph Compbell यांनी पिवळी पत्रकारिता व्याख्या केली आहे. त्यांच्या मते पिवळी पत्रकारितेचे वृत्तपत्र त्यामध्ये हेडलाईन या अधिक भडक लेखन करतात. विविध विषयावरती अनोळखी माहिती स्रोताच्या आणि स्वरचित घटना प्रसंगाचे अशी पत्रकारिता म्हणजे पिवळी पत्रकारिता म्हणून ओळखतात. या पत्रकारितेचे वैशिष्ट्ये Frank Luther Motto या सांगितली आहेत. त्यांच्या मते एक ही पत्रकारिता लहान बातमीचे भडक गडद शिर्षक म्हणून केली जाते. दुसरे यामध्ये छायाचित्र, चित्र यांचा वापर करतात. तिसरे, या पत्रकारितेत खोट्या मुलाखती दिशाभूल करणारी मुख्य हेडलाईन, अशिक्षित तंत्र लोक म्हणून त्याची मते महत्त्वाची समजली जातात, चौथे रविवार पूर्ण रंगीत पुरवणी आणि Comic Strips बरोबर त्यांचे लेखन केले जाते. पाच, व्यवस्थेच्या समोर मान झुकून काम करणे ही पिवळ्या पत्रकारितेची वैशिष्ट्ये आढळून येते. ही संकल्पना सन १८९० च्या मध्यावरती Joseph Pulitzer and William Randolph यांनी New York World आणि New York Journal यामध्ये वापरण्यात आली. Erwin Wardman यांनी New York Press मध्ये Yellow Journals and School of Yellow Kid Journalism ही वृत्तपत्रकारणी वापरली होती. ही पत्रकारिता अमेरिका देशामध्ये अधिक प्रमाणात आढळून आली.

### ४) मुक्त पत्रकारिता (Freelance Journalist) :

पत्रकारितेच्या प्रकारामध्ये मुक्त पत्रकारिता हा एक प्रकार ओळखला जातो. ही पत्रकारिता व्यक्तीश स्वतंत्रपणे केली जाते. ज्यांच्यावरती कोणत्याही प्रकारची बंधने असत नाहीत. ते मुक्त लेखन विविध आवडीच्या विषयावरती करत असतात. ज्यांना स्वातंत्र्य, मोकळीक, अवकाश आणि लेखनाची सवय असते. असे असले तरी मुक्त पत्रकार हा कष्टदाईक आणि पूर्वअंशाने देहयवादी राहू कार्य करत असतो. सद्यकाळात इंटरनेटच्या वापरातून मुक्त पत्रकारिता केली जाते. विविध वेबसाईटवरती मुक्त लेखन कार्य मुक्त पत्रकाराकडून केले जाते. यासाठी हे सामाजिक माध्यमातून आपल्या संपर्काचे जाळे निर्माण करतात. तेव्हा ते सातत्याने जनतेशी संपर्क करुन माहिती घेत असतात. त्यासाठी Online Communities शी जोडून घेण्यात येते. त्यातून Website ची बांधणी केली जाते. त्यावरती विविध प्रकारचे लेखन केले जाते जे वाचकाना सहजरित्या उपलब्ध करुन दिले जाते. या लेखनात नवीन संकल्पना विचार आणि व्यवहाराच्या आधारे विश्लेषण केले जाते. ज्यामुळे आपल्या दैनिक, मासिक आणि सामाजिक माध्यमाकडे वाचक वर्ग अधिक आकर्षित केला जातो.

**५) प्रसारन पत्रकारिता (Broadcaste Journalism):**

प्रसारण पत्रकारिता ही रेडीओ, दूरदर्शन माध्यमातून बातमी आणि माहितीचे प्रसारण केले जाते. या पत्रकारिते मध्ये हवामान, वाहतुक, खेळ आणि मनोरंजन इत्यादी घटकाचा समावेश होतो. त्याचबरोबर शोध पत्रकारिता आणि मतव्यक्त प्रकाराचा समावेश होतो. या पत्रकारितेत व्हिडिओ माध्यमातून बातमीदार बातमी आणि माहितीचे कथन सादरीकरण करत असतो. त्याचबरोबर प्रत्यक्ष घटनास्थळी पत्रकार जाऊन त्याचे निरीक्षण आणि संबंधीत घटकाशी चर्चा करुन बातमी लेखन आणि सादरीकरण करत असतो.

**६) ऑनलाईन पत्रकारिता (Online Journalism) :**

ऑनलाईन पत्रकारिता ही इंटरनेटच्या माध्यमातून केली जाते. त्यामध्ये डिजीटल वृत्तपत्रे स्तंभ किंवा सामाजिक माध्यम यांचा समावेश केला जातो. ऑनलाईन पत्रकारिता ही प्रत्यक्ष घडणाऱ्या घटनेचे बातमी आणि माहितीच्या स्वरुपात लेकन करतात. हे लेखन सामाजिक माध्यमे स्टॉटर, फेसबूक, इन्स्टाग्राम, स्तंभ लेखन, वेबसाईटच्या माध्यमातून जलद गतीने केले जाते. त्यामुळे संगणक, स्मार्ट फोन, टॅबिलेट, विविध ॲप इत्यादीच्या माध्यमातून ऑनलाईन बातमी आणि माहितीचे प्रसारण केले जाते. हे केवळ माहिती तंत्रज्ञाना, ज्ञान कौशल्य असणाऱ्या व्यक्ती व समुदायासाठी उपयुक्त पत्रकारितेचा प्रकार आहे.

**७) राजकीय पत्रकारिता (Political Journalism) :**

राजकीय पत्रकारितीचा मुख्य हेतू शासन, राजकारण आणि सत्ता राजकारण यांच्यातील घडामोडीने बातमी आणि माहितीचे लेखन कार्य केले जाते. ह्या पत्रकारितेमध्ये विविध घटकांचा समावेश पाहण्यात येतो जे स्थानिक प्रादेशिक, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील राजकीय घडामोडीचे विश्लेषण वाचकापर्यंत पोहोचवले जाते. यामध्ये राजकीय सत्ताकारण पद्धत, निवडणूक सत्ता स्थापन आणि जनतेच्या प्रश्नाचे राजकारण अधिक सविस्तर लिहिले जाते. या पत्रकारिते मध्ये राजकीय तज्ञ व्यक्ती राजकीय नेतृत्व आणि जनता यांच्या विविध मताचा मुक्त सहभाग केला जातो. त्यामुळे वाचकाला राजकीय स्थितांतरणावरती आपले जनमत निर्माण करणे शक्य आहे.

**८) गुन्हेगारी पत्रकारिता (Criminal Journalism):**

गुन्हेगारी पत्रकारिता ही दैनंदिन जीवनात घडणाऱ्या गुन्ह्याचे स्वरुप, बातमी आणि माहिती स्वरूपात वाचकापर्यंत पोहोचवली जाते. तिला गुन्हेगारी पत्रकारिता म्हटले जाते. गुन्हेगारी बातम्या मध्ये सर्वसामान्य लोकांची अधिक रूची असते त्याचा वाचक वर्ग अधिक असल्याचे दिसून येते. त्यामुळे बातमी लेखन आणि प्रसारण अधिक आहे. या बातम्यामध्ये गुन्हेगारी संबंधी स्वरुप, तिव्रता गुन्ह्याचे प्रकार, पोलीस यंत्रणा कायदा व सुव्यवस्था, न्यायालय निर्णय इत्यादी घटकांचा समावेश केला आहे. या बातम्या पोलीसांमार्फत मिळत असतात. त्यामध्ये गुन्हेगार कोण, संशयीत आरोप, पोलीस केस (प्रकरणाचा) स्थिती न्यायालयाचे निर्णय या संबंधी माहिती मिळते. त्यामुळे या

पत्रकारितेचे दीर्घकाळ संबंध अदिक स्पष्ट होतात. त्यामुळे या पत्रकारितेला महत्त्व प्राप्त झाले आहे.

**९) क्रीडा पत्रकारिता (Sports Journalism) :**

क्रीडा पत्रकारिता ही प्रामुख्याने क्रीडा विषयीच्या बातम्यांना महत्त्वाचे मानते. क्रीडा पत्रकारिता ही विविध क्रीडा स्पर्धांचे लेखन करतात. यामध्ये क्रीडा स्पर्धांचे संघ, खेळाडू, क्रीडा प्रकार, क्रीडा सामन्यातले विजय, पराजय विषयीची माहिती इत्यादींचा समावेश होतो. क्रीडा पत्रकारिता ही विशिष्ट शोध आणि मते याचे बातमीच्या स्वरुपात स्पष्ट करतात. त्याचे बातमी लेखन आणि प्रक्षेपण रूपात बातमीचे सादरीकरण करतात. १८ व्या शतकापासून ही पत्रकारिता कार्यरत आहे. ह्या बातम्यांना मध्यम आणि तळातील वर्गाचे अधिक आवडीचा विषय म्हणून समोर आला. ते ESPN आणि Sports चॅनल्सच्या माध्यमातून. स्वतंत्र क्रीडा पत्रकारिता समोर येऊ लागली. सद्यस्थिती नवीन तंत्रज्ञान आणि प्रसारणाची विविध माध्यमे येत आहेत. त्यामुळे क्रीडा बातमी लेखन आनि प्रसारणामध्ये अधिक स्पर्धात्मक आव्हाने निर्माण होत आहे.

**१०) व्यापार आणि व्यवसाय पत्रकारिता (Business and Trade Journalism):**

व्यापार आणि व्यवसाय पत्रकारिता मुख्य केंद्र हे व्यापार व्यवसाय आणि वाणिज्य क्षेत्रातील गुंतवणूक नफा व तोटा या विषयीच्या बातम्या आणि माहिती याचे लेखन यामध्ये केले जातात. व्यापारी बातमीमध्ये विशिष्ट व्यापार बँक व्यवहार कायदे व्यवहार इत्यादी विषयीची बातमी व माहिती वृत्तपत्रे मासिके आणि इंटरनेटच्या माध्यमातून या बातमीचे सादरीकरण आणि प्रसारण केले जाते. यातून संपूर्ण जागतिक स्तरावरील व्यापार व व्यवसायामध्ये अनेक स्थित्यंतरे कशी होतात. त्याचे तेजी, मंदी आणि साठेबाजार या विषयाशी संबंध समजून घेता येतात. त्यामुळे व्यापारी व व्यवसाय वर्गाला पुढील गुंतवणूक व्यापार बाजार दर याविषयीची माहिती दिली जाते. त्यामुळे या पत्रकारितेला अधिक महत्त्व आहे.

**११) जागतिक पत्रकारिता (Global Journalism) :**

जागतिक पत्रकारिता ही जागतिक दृष्टिक्षेप आणि राष्ट्रीय सीमारेषा आणि हवामान बदलाच्या समस्या या विषयीची बातमी लेखन केले जाते. या बातमीदारी मध्ये प्रादेशिक, राज्य आणि राष्ट्रीय स्थरावरील विविध समस्या संदर्भात समस्या परिवर्तन आणि विकास इत्यादी संदर्भातील बातम्याचे लेखन केले जाते. या पत्रकारितेमध्ये आंतरराष्ट्रीय संबंधाचा परिणाम समकालीन देशातील परिस्थिती संदर्भात स्पष्ट केल्या जातात. याच बरोबर जागतिक सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि पर्यावरणाच्या विषय बहुउद्देशीय पातळीवरील घटनाच्या नोंदी केल्या जातात. त्याचा दैनंदिन व्यवहारावरती काय परिणाम होतो याचे सविस्तर विश्लेषण केले जाते. त्यामुळे जागतिक पत्रकारितेला अन्यन साधारण महत्त्व प्राप्त झाले आहे.

### १२) मनोरंजन पत्रकारिता (Entertainment Journalism) :

मनोरंजन पत्रकारिता ही मनोरंजनातील बातम्या प्रसंग आणि चर्चा यासंदर्भात ओळखली जाते. याचबरोबर लोकप्रिय ऑनलाईन बातम्या, निर्मिती संपादन आणि प्रसारण या संबंधीची बाब आहे. यामध्ये चित्रपट, नाटक, संगित, गायन, वादन, फॅशन इत्यादी संबंधीच्या बातम्या प्रकाशित करतात. याच बरोबर हॉलिवूड, बॉलिवूड, प्रादेशिक चित्रपट, नाटक, मनोरंजन कार्यक्रम यामधील कलाकार यांच्या व्यक्तिगत आणि सामुदायिक जीवनातील प्रसंग अधिक गडदपणे स्पष्ट केले जातात. त्यासंबंधी मॉडेल, जाहिरात, फॅशन, मुलाखत, चित्रपट समीक्षा नाटक, संगीत कार्यक्रम इत्यादी बातमी आणि लेखन केले जाते. वृत्तवाहिनी इलेक्ट्रॉनिक आणि सामाजिक माध्यमाच्या रूपात या बातम्यांचे लेखन आणि प्रसारण केले जाते.

थोडक्यात पत्रकारिता माध्यम हे व्यापक बहुआयामी स्वरूपात बातमी आणि माहितीचे लेखन संपादन आणि प्रसारण करत असते. त्यामुळे वृत्तपत्रे इलेक्ट्रॉनिक आणि सामाजिक माध्यमातून बातमीदाराचे विविध प्रकार प्रकाशित होतो असे असले तरी वाचकाच्या आवडी निवडी आणि अभिरूची याचा परिणाम पत्रकारितेच्या प्रकारावर होतो. त्यानुसार त्या बातम्यांना आणि सादरीकरणाला महत्त्व प्राप्त झाल्याचे दिसून येते. त्यामुळे सद्यकाळी बहुआयामी व प्रकारच्या पत्रकारितेला बदलत्या माहिती व तंत्रज्ञानाच्या संदर्भात अनेक बदल स्वीकाराव्या लागतील ते चित्र समोर येते.

**आपली प्रगती तपासा :**

१) पत्रकारितेचे विविध प्रकार सविस्तर वर्णन करा.

## १.७ भारतीय पत्रकारितेचा विकास (DEVELOPMENT OF INDIAN JOURNALISM)

जागतिक स्तरावरती पत्रकारितेचा विकास मुद्रण कलेच्या शोधा नंतर अधिक विकसित झाला. सन १७८७ साली Thomas Jefferson यांनी Declaration of Independence मध्ये लिहितात की वृत्तपत्र शासन व्यवस्थेच्या निर्णयावरती लक्ष ठेवून असते. तर शासनाशिवाय वृत्तपत्र असू शकत नाही. त्याचे परस्पर संबंध हे वाचकासमोर अधिक प्रदीर्घकाळ दिसून येते. त्यामुळे पत्रकारितेचे स्वरूप हे मुद्रित इलेक्ट्रॉनिक आणि सामाजिक माध्यमातून विकसित होताना दिसते. नव माहिती आणि तंत्रज्ञानाच्या विकासाचा परिणाम भारतीय पत्रकारितेसमोर नवीन विकासत्मक संधी आणि आव्हानाना सामोरे जावे लागत आहे. यासाठी या पत्रकारितेच्या सुरुवातीच्या कालखंडापासून आजपर्यंतच्या विकासाचे स्वरूप समजून घेता येईल.

जागतिक स्तरावरती वृत्तपत्राची निर्मिती ही रोम देशामध्ये झाल्याचे पत्रकारितीच्या विकासाच्या इतिहासात आढळून येते. या देशामध्ये विशिष्ट प्रकारची बातमी लिहून सर्वत्र पसरवण्यात येत होती. यामध्ये daily act ही दैनंदिन हाताने लिहिणारी वृत्तपत्र हे शासनामार्फत Roman Forum याज कडून प्रकाशित करण्यात आले. त्यानंतर

munotes.in

राजकीय घटना सैनिकी संघटन आणि प्रदर्शन सामाजिक सांस्कृतिक संबंधित घटना इत्यादी संबंधी माहिती पत्रकारितेतून स्पष्ट होऊ लागली. चायना देशात शासनाने Tipao च्या नावाने बातमी पत्र तयार करण्यात आले हे शासकीय स्तरावरती Han Dynasty आणि Tang Dynasty या मुद्रित वृत्तपत्राची प्रकाशन करण्यात येऊ लागले.

सन १४५० नंतर युरोपात मुद्रित वृत्तपत्र प्रेसचा वापर करण्यात येऊ लागला. सन १४७० च्या काळात इटालियन वृत्तपत्राचे छापखाने तयार करण्यात आले. ज्याचा लेखाजोगा ठेवण्यात आला. इ.स. १६०० ते १७०० या काळामध्ये मुद्रित साहित्याचा निर्मितीमध्ये अधिक विकसित झाले. या मुद्रित लेखात हे पेजच्या एका बाजूने लिहिण्यात येऊ लागले. हे अमेरिकेतील ब्रिटीश वसाहतीमध्ये वाटप करण्यात येते असे. सन १५४१ साली अमेरिकेतील भूकंपाचे वर्णन Guatemala मध्ये Mexico मधून प्रकाशित करण्यात आले.

इनसायक्लोपिडीया ब्रिटानिका यांच्या मते सन १६०९ मध्ये जर्मन शहर आणि Antwerp मध्ये प्रथम वृत्तपत्राचे सत्यशील प्रकाशन करण्यात आले. सन १६२२ साली इंग्लड मध्ये Weekly News प्रकाशित करण्यात आले. सन १७०२ साली The Daily Courent हे प्रथम वृत्तपत्र प्रकाशित झाले. या वृत्तपत्रावरती सेनस्पाटशिष मालकी अधिकार आणि बंधने आणल्यामुळे वृत्तपत्राच्या प्रकाशनामध्ये अनेक अडथळ्यांना सामोरे जावे लागते. असे असले तरी वृत्तपत्राचा प्रसार हा साक्षरतेच्या प्रमाणामध्ये वाढ होऊ लागली. त्यामुळे वृत्तपत्राच्या निर्मितीची अधिक भक्कम महत्त्वपूर्ण बांधणी करण्यात यश प्राप्त झाले.

सतराव्या शतकामध्ये वृत्तपत्राचा प्रसार वाढीला अधिक महत्त्व प्राप्त झाले. समकालीन घटनाच्या संदर्भात मासिकाच्या माध्यमातून विविध विषयांचे लेखन करण्यात येऊ लागले. Tatler (१७०९-११) आणि Spectator (१७११-१२) या दोन मासिका माध्यमातून मासिक प्रसारण करण्यात येईल ही महागडी आणि अधिक खर्चीक बाब म्हणून समोर आली. त्यामध्ये जाहिराती प्रकाशनासाठी खर्च करण्यात आला. त्या रक्कमेतून मासिकाचे प्रकाशन खर्च करण्यात येऊ लागले. सन १८३० साली मासिकाच्या निर्मितीत अधिक गतिशीलता निर्माण झाली. यानंतर रेडीओ, टेलिफोन आणि दूरदर्शन याच्या माध्यमातून बातमीचे प्रकाशन आणि प्रसारणामध्ये वाढ होऊ लागली. सध्या हे इंटरनेटच्या माध्यमातून बातमीचे स्वरूप अधिक लोकांना उपलब्द करण्यात येत आहे.

भारतातील वृत्तपत्राच्या ऐतिहासिक विकासाच्या टप्प्यावरती पाहण्यात येते. हे सिंधू नदीच्या काठावरील विविध प्रक्रियांमध्ये वृत्तपत्राचा विकास होताना दिसून येते. यामध्ये शिलालेख, ताम्रपट, स्तंभ लेख, लाकूड, अशा याच्यावरती वृत्तपत्राचे लेखन पाहण्यास मिळते. विशेषत: सम्रट अशोकाच्या कालखंडामध्ये वृत्तलेखन विविध नमुने पाहण्यास मिळतात. तसेच पारंपरिक राजकीय साम्राज्यामध्ये न्यायालय आणि दरबारा मध्ये बातमीचा प्रसार सामुदायिक पातळीवरती देण्यात येत असे. तसेच गाव पातळीवरती एखादी बातमी देण्यासाठी आरोळी देऊन बातमीचा प्रसार करण्यात येऊ लागले.

त्यामुळे मौखिक आणि लिखित स्वरूपात बातमीचे प्रसारण करण्यात आल्याचे दिसून येते.

वृत्तपत्राच्या ऐतिहासिक विकासाच्या टप्प्यामध्ये पाहण्यास मिळते. प्राचीन काळामध्ये सभ्यताकरणाच्या परिस्थितीमध्ये बातमी ही संवादाच्या स्वरूपात प्रसारित करण्यात आले. त्यामुळे संपूर्ण राज्यामध्ये शासनव्यवस्था स्थापन करता आली. सुलतान काळात Barid-i-Mamalik हा स्वतंत्र माहिती प्रसार अधिकार देण्यात आला. त्यामुळे बातमीचा प्रसार संपूर्ण साम्रज्यात करण्यात आला. सुलतान अलाउद्दीन खिलजी यांनी माहिती प्रसारासाठी स्वतंत्र व्यवस्था निर्माण करण्यात आली होती. मुघल शासन व्यवस्थेत बातमी प्रसारणासाठी बकाई-भितविस, सणनीद-नवीम आणि खुफिया नविस या प्रकारे बातम्या प्रसारण करण्यात आली. ह्या बातम्या गावात ढोल वाजवून भारतात मुद्रण (Printing) ची Guttenberg यांनी Bible ची छपाई करण्यात आली. सन १५५६ जुने गोवा राज्यामध्ये Paul's मध्ये ख्रिाश्चन मिशनर्याकडून छपाई यंत्राचा वापर करण्यात आला. ज्याचा परिणाम म्हणून Conclusions Philosophicas प्रकाशनाची निर्मिती करण्यात आली. ही Emperor of Abyssinia यांनी सर्वप्रथम सुरुवात करण्यात आली. जी ख्रिाश्चन मिशनरी यांच्या सहाय्याने चालवण्यात आली. यामुळे भारतीय प्रेसच्या मुद्रित छपाईच्या कार्याची सुरुवात झाली.

सतराव्या शतकामध्ये मुद्रित छपाईच्या विस्तृत प्रमाणात विविध भाषामध्ये प्रकाशित करण्यात येऊ लागले. पाश्चिमात्य देशाच्या पद्धतीने छपाई यंत्राच्या पद्धतीच्या वापराची सुरुवात करण्यात आली. ब्रिटिश वसाहत काळामध्ये भारतात छपाई कारखान्याची निर्मिती करण्यात आली. हे औद्योगिकीकरण, शहरीकरण आणि आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेचा भाग म्हणून छपाई यंत्राची निर्मिती गतिशील करण्यात आली. यामध्ये डाक आणि तार यंत्रणा रेल्वे वाहतूक यांचा विकास करण्यात आला. टेलिग्राम आणि पोस्ट ऑफिस टेलिफोन यांच्या माध्यमाने संवादाचे जाळे विस्तृत प्रमाणात वाढण्यात आले. यातून वृत्तपत्राची ओळखीची सुरुवात झाली.

ब्रिटिश वसाहतिक काळात भारतात छपाई यंत्रणाची सुरुवात ब्रिटिश व्यक्तिकडून सुरुवात आली. ब्रिटिश शासन पद्धतीने शिक्षण प्रसाराचे कार्य इंग्रजी भाषेतून करण्यात आली. त्याच्या लिखित साहित्यातून राष्ट्रवाद आणि लोकशाही व्यवस्थेची जाणीव निर्माण झाली. या मधून प्रबोधनाचे आणि शास्त्रीय ज्ञानाचा प्रसाद भारतीय जीवन परंपरावरती होऊ लागला. भारतीय समाज आपल्या प्रथा परंपरा रुढी जीवनपद्धती या विषयी ज्ञान आणि व्यवहाराच्या स्तरावरती प्रश्न उपस्थित करणारा नवशिक्षिताच वर्ग, सामाजिक सुधारणा चळवळीची निर्मितीमध्ये सहभाग घेऊ लागला. त्यामुळे समाज प्रबोधनाचे साधन म्हणून वृत्तपत्राची निर्मिती करण्यास पोषक वातावरण निर्माण होऊ लागले. सामाजिक सुधारणा आणि देशाचे स्वातंत्र्यविषयीची चळवळ वृत्तपत्रामुळे गतिशील झाली.

सन १७५६ साली William Bolts यांनी ब्रिटिशांच्या इस्ट इंडिया कंपनीमध्ये नोकरी करत असताना सर्व प्रथम वृत्तपत्राची निर्मिती केली. पण हा प्रयत्न फार काळ टिकू शकला नाही. २९ जानेवारी १७८० साली James Augustus Nicky यांनी व्यक्तिगत स्थरावरती Bengal Gazette किंवा Calcutta General Advertiser हे भारतातील इंग्रजी माध्यमातील पहिले वृत्तपत्र असे नोंदवण्यात आले. त्यांनी याबद्दल भूमिका स्पष्ट केली हे वृत्तपत्र आठवडी राजकीय आणि व्यावसाईक स्वरूपात ?? प्रकाशित करण्यात येईल या वरती कोणत्याही राजकीय प्रभूत्व व प्रभावाखाली न येता ते मुक्त स्वरूपात काम करेल. सन १७८०-१७९३ या काळात कलकता मधून ६, मद्रासमधून बॉम्बे मधून वृत्तपत्र प्रकाशित करते. या वृत्तपत्रात शहरी आणि ग्रामीण वाचकाना पत्रव्यवहाराचे वाचन लेखन राजकीय चर्चा कवीसाठी लेखन व्यवस्था यामध्ये करण्यात आली. तसेच ब्रिटिश शासनव्यवस्थे संबंधी लेखन करण्यात येत होते. याच काळात सामाजिक प्रथापरंपराच्या अंधश्रद्धा मुल्य नियम आधारित सामाजिक संरचनेच्या विरोधात सुधारणकाचा नवशिक्षित संशोधक अभ्यासक नवतरुणाचा वर्ग निर्माण झाला. ख्रिश्चन मिशनर्याचा शिक्षण प्रसार परिणाम म्हणून नवशिक्षित वर्ग निर्माण झाला. याच्यामध्ये नव जाणीव जागृत असा प्रबोधनकारी सुधारकानी वृत्तपत्राला सामाजिक जाणीवा जागृती आणि सुधारकाच्या भूमिकेतून तयार करण्यात आला. यातून पश्चिम बंगाल राज्यातील सामाजिक सुधारक राजाराम मोहन रॉय यांनी वृत्तपत्राची सुरुवात करण्यात आली. सन १८२२ साली Brahminical Magazine सुरुवात केली. याच बरोबर संवाद कौमोदी आणि मिरातोल अकबर (Miratool Akbar) याची वृत्तपत्राची सुरुवात केली. याच काळात Ferduuji Marzben यांनी Bombay Samachar ची मुंबई मधून सुरुवात केली. तर सन १८२२ साली बंगाल मधून Chandrika Samachar सुरुवात केली. याची राष्ट्रीय स्तरावरती निर्मिती करण्यात आली.

भारतातील ब्रिटिश शासन व्यवस्थेच्या काळात राष्ट्रीय आणि प्रादेशिक वृत्तपत्राची निर्मिती करण्यात आली. यामध्ये सहा वृत्तपत्रे बंगाल तीन वृत्तपत्रे मद्रास आणि तीन वृत्तपत्रे बॉम्बे म्हणून प्रसिद्ध होत गेली. याच काळात मुक्त वृत्तपत्र सुरु होती. पण नंतर ब्रिटिश शासन व्यवस्थेने वृत्तपत्रासंबंधी निर्बंध आणण्यासाठी सन १७७४ साली Vernacular Press Act चा कायदा करण्यात आला. हा कायदा वृत्तपत्राच्या नियंत्रणाखाली करण्यात आला. याच वेळी Bombay Times म्हणून Times of India या इंग्रजी वृत्तपत्राची ब्रिटिश शासन व्यवस्थेच्या शोषणाविरुद्ध वृत्तपत्रीय लेखनातून आवाज उठवला. तर Hindu Patriot या वृत्तपत्रानी ब्रिटिशांना शेतकऱ्यांवर लादलेल्या पिकपद्धतीला विरोध दर्शविला. सन १८२६ साली उदात मार्तेंड हे पहिले हिंदी भाषेतील वृत्तपत्र प्रकाशित करण्यात आले, तसेच The Times of India, Hindustan Times, Indian Express, The Hindu ही राष्ट्रीय स्तरावरील वृत्तपत्राची निर्मिती करण्यात आली. याचे सामाजिक आर्थिक राजकीय क्षेत्रात योगदान महत्त्वाचे आहे.

भारतात प्रादेशिक वृत्तपत्राची सुरुवात स्थानिक भाषेच्या माध्यमातून करण्यात येऊ लागली. यामध्ये आनंद बझार पत्रिका ही बंगाली भाषेतून प्रकाशित करण्यात आली. संदेश आणि ही Bombay Samachar गुजराती भाषेतुन तर Matribhum हे

मल्यालम भाषेतून प्रकाशित करण्यात आले. सन १८३६ साली उर्दू भाषेतील Urdu Akhbar हे वृत्तपत्र Maulawi Muhammad Bagir यांनी प्रकाशित केले. सन १८३८ साली Bombay Times या वृत्तपत्राचे Time of India अशी ओळख निर्माण करण्यात आली. Hindu Patriot या वृत्तपत्राने ब्रिटिश पिक पद्धतीच्या सक्तीच्या विरोधात प्रथम जनजागृती केली. सन १८३२ मध्ये Anglo Marathi वृत्तपत्र दर्पण हे बाळशास्त्री जांभेकरांनी पुणे मधून सुरु केले. दर्पण हे मराठीतील पहिले वृत्तपत्र आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांनी सर्वप्रथम सुरुवात केली तर केसरी वृत्तपत्राची सुरुवात लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांनी सुरुवात करण्यात आली. या प्रादेशिक वृत्तपत्रानी सामाजिक सुधारणा चळवळी बरोबर राष्ट्रवादाची जाणीव निर्माण करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे ही वृत्तपत्र अधिक प्रमाणात प्रसारित झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समाजातील वंचित घटकांना न्याय, हक्क आणि सन्मान मिळावा यासाठी मुकनायक, बहिष्कृत भारत, जनता आणि प्रबुद्ध भारत या वृत्तपत्राच्या माध्यमातून सामाजिक चळवळीचे कार्य करण्यात आले. याच काळात महात्मा गांधी यांनी हरिजन या वृत्तपत्र वंचित घटकाच्या जनजागृती करण्यासाठी लेखन कार्य केले. त्यामुळे समाजातील वंचित घटकामध्ये स्वाभिमान, आत्मसात, स्वावलंबन निर्माण करण्यास प्रोत्साहित करण्यात आले.

ब्रिटिश काळामध्ये Radio च्या माध्यमातून पत्रकारितेला सुरुवात झाली. ब्रिटिश शासन व्यवस्थेने Radio च्या खाजगी प्रसारणासाठी मान्यता दिली. सन १९२४ साली मद्रास प्रांतात Radio च्या प्रसारणाची सेवा खाजगी तत्वावरती सुरुवात केली. त्यानंतर कलकत्ता आणि बॉम्बे या शहरामध्ये रेडिओ प्रसारण सेवा निर्माण केली. सन १९३० साली Indian State Broadcasting Corporation ची स्थापना ब्रिटिश शासन व्यवस्थेच्या अंतर्गत करण्यात आली. याचे नंतर All India Radio हे नाव देण्यात आले. हा विभाग संज्ञापन विभागा अंर्तगत होते. सन १९४७ नंतर माहिती प्रसारण मंत्रालय याची सुरुवात करण्यात आली. All India Radio चा मुख्य उद्देश राष्ट्रीय एकात्मता आणि राष्ट्रीय जाणीवेचे निर्मिती असा होतो. या प्रसारणामध्ये सामाजिक आधुनिकीकरणाचा प्रसार करण्यात आला. या माध्यमातून माहिती, बातमी आणि मनोरंजनाचा प्रचार अधिक प्रमाणात विकसित करण्यात आला. याचे बातमी प्रसार विशिष्ट वेळी करण्यात येते. त्याच्या आंतरराष्ट्रीय राष्ट्रीय प्रादेशिक स्थरावरती बातमीचे वृत्त निवेदन, समालोचन केले जाते. यामध्ये शेती व्यापार व्यवसाय बालके महिला कामगार याविषयी स्वतंत्र प्रसारण केले जाते.

भारतात टेलिव्हिजन सुरुवात स्वातंत्र्य उत्तर काळात झाल्याचे पाहण्यात मिळते. सन १९५९ साली भारतात टेलिव्हिजन प्रसारणाची सुरुवात प्रथम दिल्ली मध्ये करण्यात आली. या माध्यमातून भारतातील सर्व राज्यामध्ये विकासाची भूमिका घेऊन कार्य करण्यात आले. सरकारने या माध्यमातून श्राव्य व दृश्य स्वरूपात प्रसारण येण्यास सुरुवात झाली. हे प्रसारण दिवसातील विशिष्ट वेळी होत असते. ते दिवसातून चार तास होते. या प्रसारण कार्यक्रमात माहिती, बातम्या, मुलाखती, शेती, आरोग्य, व्यापार, महिला, बालके, शिक्षण, मनोरंजन यातून सादरीकरण केले जाते. दूरदर्शन वरील पत्रकारिता ही आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, प्रादेशिक बातम्याचे प्रसारण करण्यावरती अधिक

केंद्रिय मानले जाते. या सादरीकरणात बातमी सोबत फोटो आणि कार्यक्रमाचे छाया ध्वनिफित रेकॉर्डिंग चे सादरीकरण करण्यात येते. याच सोबत जाहिरात प्रसारण केले जाते. सन १९७६ नंतर दूरदर्शन चे National Television Network मार्फत व्यावसायिक जाहिराती, चित्रपट, नाटक, संगीत, गायन, कार्यक्रम सादरीकरण करण्यात येऊ लागले. सन १९९१ नंतर International Satellits Television माध्यमातून विविध कार्यक्रमाचे सार्वजनिक स्तरावरती प्रसारण करण्यात येऊ लागले. भारताने ASIASAT-1 ची प्रक्षेपण पाच चॅनलद्वारे करण्यात आली. सन १९९४ साली Zee TV ही प्रथम हिंदी Satellite Channel म्हणून प्रसारण करण्यात आले. या सुरुवातीने अनेक खाजगी, इंग्रजी, हिंदी आणि प्रादेशिक वाहिन्याची सुरुवात झाली आहे. त्याचे वृत्तविभाग व्यवस्थापन बातमी पत्रकार प्रत्यक्ष क्षेत्रात जाऊन बातमीचे Live सादरीकरण करताना पाहण्यास मिळतात.

सद्यस्थितीत पत्रकारितेचे स्वरूप गतिशील व विकसित स्वरूपात पाहण्यास मिळतात. खाजगी वृत्तपत्राचे प्रमाण वाढत असले तरी सरकारच्या वृत्तपत्र कायद्याचे नियमाचे पालन करुन कार्य करावे लागते. टिकात्मक आणि विकासात्मक स्वरूपात शासन, राजकारण आणि सरकार यामध्ये सुलभ संवाद साधला जातो. राष्ट्रीय आकाशवाणी आणि प्रादेशिक रेडिओ प्रसारणाबरोबर FM च्या माध्यमातून बातमी आणि चालू घडामोडीवरती वृत्त सादरीकरण मुलाखत माहिती आणि मनोरंजनाचे कार्यक्रम केले जातात. तसेच मलिडीव्हास मध्ये फोटो व्हिडियो सीडी, डीव्हीडी पेनड्राइव यासारख्या साधनाचा वापर माध्यमामध्ये होत आहे. इंटरनेटच्या माध्यमातून इमेल, फेसबूक, ट्विटर, स्कायप, व्हाटस्प, नेटवर्कच्या आधारे वृत्तपत्रकारिते मध्ये नवे रूप धारण करण्यात येत आहे. त्यामुळे पत्रकारिता क्षेत्रात माहिती व तंत्रज्ञान संप्रेषण माध्यमातून अधिक व्यापक परिवर्तन व विकास होताना पाहण्यास मिळतो.

**आपली प्रगती तपासा :**

१) भारतीय पत्रकारितेच्या विकासाचा सविस्तर आढावा घ्या.

## १.८ पत्रकारिता कायदे (JOURNALIST LAW )

भारतातील वृत्तपत्रविषयीचे विविध कायदे आले. हे कायदे व दैनिकाच्या, पत्रकार, वृत्तपत्राची भूमिका, राजकारण, गोपनियता या संदर्भात स्पष्ट करण्यात आले आहेत. आपल्या देशामध्ये वृत्तपत्रांना लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ मांडला जातो. सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नाची बाजू सार्वजनिक स्तरावरती मुक्तपणे मांडली जाते. त्यामुळे व्यापक जनसमुदायाचे प्रश्न समस्या सोडवण्यासाठी सतत कार्यरत असणारी वृत्तपत्राची भूमिका आणि व्यवहार समजून येतो. असे असले तरी वृत्तपत्र पत्रकारिता यांच्यावरती कायद्याच्या माध्यमातून अनेक निर्बंध लादण्यात आले आहेत. या कायद्याच्या माध्यमातून वृत्तपत्राच्या स्वातंत्र्याचे संरक्षण आणि नियंत्रण केले जाते. या कायद्याना एकत्रितपणे वृत्तपत्रविषयीचे कायदे असे म्हटले आहे. त्याची व्यापक प्रकारचे स्वरूप समजून घेणे आवश्यक आहे.

एकोणिसाव्या शतकामध्ये भारतीय वृत्तपत्र व पत्रकारिता ब्रिटिश काळामध्ये विकास होत असल्याचे आढळून येते. हे ब्रिटिश शासन व्यवस्थेच्या विरोधात राष्ट्रवादाची चळवळ निर्माण करण्यावर जनमत जागृत करण्याचे काम करत होते. हे ब्रिटिश शासनव्यवस्थेला समजल्यानंतर त्यांनी भारतीय वृत्तपत्रे व पत्रकार यांच्यावरती निर्बंध लादण्यास कायद्याची निर्मिती करण्यात आली. याचवेळी भारतातील पहिले वृत्तपत्र बेंगाल गॅझेट (१७८०) यावरती निर्बंध घालण्यासाठी सन १७१२ साली या वृत्तपत्राचा छापखाना सरकार कडून जप्त करण्यात आला. हा कायदा सन १७९९ च्या काळात Censorship Act १७९९ अशा नावाने ओळखण्यात आला. हा कायदा लॉर्ड वेलस्वीच्या काळात करण्यात आला. ब्रिटिशांनी हा कायदा वृत्तपत्राच्या माध्यमातून शासन व्यवस्थेच्या विरोधात कोणताही मजकूर बातमी छापता कामा नये. यासाठी या कायद्याची निर्मिती करण्यात आली. पण लॉर्ड हास्टिंगच्या काळात या कायद्यातिल निर्बंध रद्द करण्यात आले.

ब्रिटिश शासन व्यवस्थेने वृत्तपत्राच्या परवानगी संदर्भात कायद्याची निर्मिती केली. सन Licensing Regulation 1828 या नावाने कायदा करण्यात आला. हा कायदा प्रमाणे बिना परवाना वृत्तपत्र सुरु करणे कायद्याने गुन्हा समजण्यात येईल. याला फौजदारी गुन्हा म्हणून ओळखण्यात येत होते. या कायद्यामुळे राजा राममोहन रॉय यांच्या मिरत-उल अखबार या वृत्तपत्राचे प्रकाशन बंद करण्यात आले. सन १८२३ च्या कायद्यानुसार घातलेले निर्बंध या कायद्यात काढून टाकले. हा कायदा चार्ल्स मेटकाल्फच्या काळात प्रेरित केला. त्यामुळे मेटकाल्फला वृत्तपत्राचा मुक्तिदाता असे म्हटले आहे. हा कायदा रद्द केल्याने भारतीय वृत्तपत्राच्या संख्येमध्ये वाढ करण्यात आली. सन १८५७ मध्ये युद्ध काळामध्ये वृत्तपत्रावर पुन्हा काही काळ निर्बंध लादण्यात आले.

भारतातील स्थानिक भाषेतील वृत्तपत्रावर निर्बंध लादण्यासाठी ब्रिटिश शासन व्यवस्थेने नवीन कायदा निर्माण केला. सन १८७६ साली Vernacular Press Act (1856) कायदा करण्यात आला. या कायद्यातंर्गत वृत्तपत्राच्या संपादकाला आणि प्रकाशकाला या कायद्यानुसार जिल्हा दंडाधिकारी बरोबर करार करायची सक्ती या करारात सरकार विरोधी असंतोष पसरविणारे लेखन न करण्याची सक्ती करण्यात आली. या कायद्यांतर्गत सरकार विरोधी वृत्तपत्रामध्ये लेखन केल्यास छपाईखाना जप्त करण्यात येईल. ह्या कायद्यांतर्गत जिल्हा दंडाधिकाऱ्याचा या बाबत निर्णय अंतिम. दंडाधिकाऱ्याचा विरोधात न्यायालयात अपिल करण्यावरती निर्बंध घालण्यात आले. ह्या कायद्यान्वये भारतीय भाषेतील वृत्तपत्रे व इंग्रजी भाषेतील वृत्तपत्रामध्ये भेदभाव करण्यात आला. हा कायदा सन १८७८ साली लॉर्ड लिटनच्या काळात करण्यात आला. या कायद्यांतर्गत भारतीय पत्रकारितेचे कर्तव्य बजावत असताना वेगाली वृत्तपत्राचे पत्रकार सुरेंद्रनाथ बॅनर्जी (१८८३) यांनी शाळीग्राम देवतेच्या अपमानाबद्दलच्या खटल्यात त्यांनी न्यायादिशावरती टिका केली होती. त्याबद्दल या कायद्यांतर्गत शिक्षा भोगावी लागली तर महाराष्ट्रात लोकमान्य टिळकांना या कायद्यांतर्गत १८ महिन्याची शिक्षा भोगावी लागली होती. यानंतरच्या काळात पहिल्या आणि दुसर्या महायुद्धाच्या काळात भारतीय वृत्तपत्रावरती निर्बंध लादण्यात आले होते.

